# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 08 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

दिल्लीतील विधानसभा निवडणुकीत सर्व ७० जागांचे कल हाती आले असून भारतीय जनता पक्षाला ४० जागांवर आघाडी मिळालेली आहे. तर सत्ताधारी आम आदमी पक्ष ३० जागी आघाडीवर आहे. आम आदमी पक्षाचे संयोजक दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदीया यांचा पराभव झाला आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी परवा सोमवारी सकाळी ११ वाजता परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशभरातले विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. या संवादातून परीक्षेची तयारी, तणाव व्यवस्थापन आणि व्यक्तीमत्व विकास याबाबत पंतप्रधान आपले विचार सादर करतील.

****

राज्यातील सर्व आरोग्य संस्थांमधला औषधाचा उपलब्ध साठा आणि गुणवत्ता याची नवीन नियमावलीप्रमाणे तपासणी करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत दिले आहेत.

राज्यातील सर्व रुग्णालयांनी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवावा. औषध गुणवत्ता तपासणी मोहीम नवीन नियमावलीनुसार करावी. सर्व आरोग्य संस्थांनी खरेदी केल्यानुसार औषधाच्या नोंदी ई-औषधी प्रणालीमध्ये ४८ तासांच्या आत घ्याव्यात, औषध साठ्याच्या समूह क्रमांकनिहाय नोंदी बिनचूक असाव्यात, तपासणी अहवालानुसार प्रमाणित केलेल्या औषधांचा वापर करावा, आदी नियमावलीचं काटेकोर पालन करण्याचे निर्देशही आरोग्य मंत्र्यांनी दिले आहेत.

****

संवाद चिमुकल्यांशी` अभियानांतर्गत आदिवासी विकास मंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके यांनी यवतमाळ जिल्ह्यातल्या बोटोणी या शासकीय आश्रमशाळेत काल मुक्काम केला. इथल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासोबतच त्यांनी आश्रमशाळेतल्या सोयी-सुविधांची पाहणी केली. आदिवासी विकास विभागाच्या राज्यातील सर्व आश्रमशाळा शैक्षणिक गुणवत्तेनं परिपूर्ण करु, असं ते यावेळी म्हणाले.
दरम्यान, आदिवासी विकास मंत्र्यांच्या आदेशानुसार काल रात्री अनेक नेते आणि विभागाच्या अधिकाऱ्यांनी नंदुरबार जिल्ह्यातल्या वेगवेगळ्या आश्रमशाळांवर मुक्काम केला.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या बारावीच्या परिक्षा येत्या ११ फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. यंदा छत्रपती संभाजीनगर विभागातून परभणी, हिंगोली, बीड, छत्रपती संभाजीनगर, आणि जालना या जिल्ह्यातून एक लाख ८५ हजार ३०० विद्यार्थी बारावीची परीक्षा देणार आहेत. यासाठी मंडळानं ४६० परीक्षा केंद्रं निश्चित केली आहेत.
दरम्यान, परीक्षेच्या या काळात अनेक विद्यार्थी नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भितीने मानसिक दडपणाखाली असतात. अशा विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी ऑनलाईन समुपदेशन करण्याकरीता राज्यमंडळ स्तरावरुन समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ९०११३०२९९७, ९९६०६४४४११, ८१६९२०२२१४, या भ्रमणध्वनी क्रमांकांवर सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत संपर्क करुन विद्यार्थ्यांना समुपदेशनाचा लाभ घेता येणार आहे.

****

जगभरात प्रदर्शित होणारे उत्तमोत्तम आशयघन चित्रपट राज्यातल्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध संस्था दरवर्षी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं आयोजन करतात. अशा संस्थांसाठी शासन अर्थसहाय्य योजना राबवत असून `प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य` या तत्त्वावर निकषांची पूर्तता करणाऱ्या १० संस्थांना प्रती वर्षी १० लाख रुपये अनुदान देण्यात येतं. ही योजना चित्रपट, माहितीपट आणि लघुपट महोत्सावाचं आयोजन करणाऱ्या संस्थांसाठी लागू आहे. या योजनेचा संस्थांनी लाभ घ्यावा, असं आवाहन महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील आणि सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. धनंजय सावळकर यांनी केलं आहे.

****

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ इथं नोकरीच्या आमिषानं दोन तरुणांची १२ लाखांची फसवणूक झाल्याचं काल उघडकीस आलं. सरकारी शाळेत शिपाई आणि क्लर्क पदावर नोकरी लावून देण्याचं आमिष दाखवून धिरज बद्रीनारायण बाहेती आणि दीपा धीरज बाहेती या दांम्पत्यानं दोन तरुणांकडून  १२ लाख रुपये उकळले. याप्रकरणी बाहेती दाम्पत्यावर निसर्ग जमशेट्टे यांनी परळीच्या संभाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर त्यांच्यावर काल गुन्हा दाखल करण्यात आला.

****

राज्यस्तरीय पिक स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे. रब्बी ज्वारी आणि करडईचं भरघोस पीक घेऊन नांदेड जिल्ह्यातील तीन शेतकऱ्यांनी राज्यस्तरावर क्रमांक पटकावले. देगलूर तालुक्यातून माधव शंकरराव पाटील, कुडली इथले सुनील नामदेव चिमणपाडे तर लोहा तालुक्यातील सायाळ इथले शेतकरी रत्नाकर पाटील ढगे सायाळकर या शेतकऱ्यांचा यात समावेश आहे.

****